कोकण विभाग

महसूल प्रशासनातील लेखाशीर्ष "२०५३- जिल्हा प्रशासन" या अंतर्गत क्षेत्रीय अधिका-यांना वाहनांची अनुज्ञेयता मंजुर करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः जेपीएस-२०१४/प्र.क्र.११/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ०२ डिसेंबर, २०१७.

संदर्भ:-

१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-वाहन-१०००/प्र.क्र.६५/२००१/विनियम, दि.१०.०९.२००१.

२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र
क्रमांक/साशा/रकाप/शासकीय वाहने/कावी ३५२/२०१३, दि.२९.०७.२०१३
क्र. GEN-१७०१३/२/२०१४, दि.०३.११.२०१४.
क्रमांक/साशा/कार्या-१/रकाप/वाहन/२०१५, दि.१६.११.२०१५
क्रमांक/साशा/कार्या-७/वाहन आढावा/तह/पाल.वाहन/१००८/२०१६, दि.०७.०२.२०१७

३) वित्त विभाग पत्र क्र. वाहन-२०१६/प्र.क्र.४२/१६/विनियम, दि.२५/१०/२०१७ अन्वये प्राप्त राज्य स्तरीय वाहन आढावा समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना:-

वित्त विभागाने संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दि.१०/०९/२००१ अन्वये वाहन अभिहस्तांकीत असलेल्या अधिका-यांच्या पदांच्या जबाबदा-या विचारात घेऊन वाहनांचा आढावा घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुषंगाने कोकण महसूल विभागातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व अपर तहसिलदार या क्षेत्रिय कर्यालयातील लेखाशिर्ष "२०५३- जिल्हा प्रशासन" याखाली वेतन आहरीत करणा-या अधिका-यांच्या कामाचे स्वरुप व कर्तव्ये विचारात घेऊन सदरहू अधिकारी वर्गास देण्यात आलेल्या शासकीय वाहनांचा आढावा घेण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांनी संदर्भ क्र. २ येथील पत्रांन्वये शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या संदर्भीय दि.१०.०९.२००१ च्या शासन निर्णयांतर्गत स्थापित राज्यस्तरीय समितीपुढे आढाव्यासाठी सादर करण्यात आला असता सदर समितीने एकूण ९७ वाहनांची अनुज्ञेयता दि.१०/१०/२०१७ च्या बैठकीत मंजूर केली आहे. त्यानुषंगाने वर नमूद अधिका-यांसाठी वाहनांच्या अनुज्ञेयते विषयी आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

कोकण महसूली विभागातील विभागीय आयुक्त, कोकण विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेल्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील क्षेत्रीय महसूल कार्यालयांच्या आस्थापनेवरील लेखाशिर्ष "२०५३- जिल्हा प्रशासन" याखाली वेतन आहरीत करणा-या

अधिका-यांकरीता खालील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार एकूण ९७ वाहने अनुज्ञेय करण्यास शासन मान्यता देत आहे.-

अ. क्र.	कार्यालयाचे नांव	पदनाम	अनुज्ञेय वाहन प्रकार/संख्या		कार्यालय निहाय एकूण वाहने	
			कार	जीप	कार	जीप
१.	विभागीय आयुक्त, कोकण	विभागीय आयुक्त	१	-	४	-
		अपर आयुक्त	१	-		
		उप आयुक्त (२)	२	-		
२.	जिल्हाधिकारी, मुंबई शहर	जिल्हाधिकारी	१	-	२	--
		अपर जिल्हाधिकारी	१	-		
३.	जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर	जिल्हाधिकारी	१	-	२	५
		अपर जिल्हाधिकारी	१	-		
		उप विभागीय अधिकारी पश्चिम उपनगर/ पूर्व उपनगर (२)	-	२		
		तहसिलदार, कुर्ला/ अंधेरी/ बोरीवली (३)	-	३		
४.	जिल्हाधिकारी, ठाणे	जिल्हाधिकारी	१	-	२	१२
		अपर जिल्हाधिकारी	१	-		
		उप विभागीय अधिकारी ठाणे/ कल्याण/ उल्हासनगर/ भिवंडी (४)	-	४		
		तहसिलदार उल्हासनगर/मुरबाड/शहापूर/ कल्याण/ भिवंडी/ ठाणे/ अंबरनाथ/ रेतीगट (ठाणे) (८)	-	८		
५.	जिल्हाधिकारी, पालघर	जिल्हाधिकारी	१		२	१३
		अपर जिल्हाधिकारी	१			
		उप विभागीय अधिकारी पालघर/ वसई/ डहाणू/ वाडा/ जव्हार (५)	-	५		
		तहसिलदार पालघर/ वसई/ तलासरी/ विक्रमगड/ मोखाडा/ वाडा/ जव्हार/ डहाणू (८)	-	८		
६.	जिल्हाधिकारी, रायगड	जिल्हाधिकारी	१	-	२	२४
		अपर जिल्हाधिकारी	१	-		
		उप विभागीय अधिकारी अलिबाग/ पनवेल/ माणगांव/ महाड/ रोहा/ कर्जत/ पेण/ श्रीवर्धन (८)	-	८		
		तहसिलदार अलिबाग/ पेण/मुरुड/ पनवेल/ उरण/ कर्जत/ खालापूर/ माणगाव/ तळा/ रोहा/ पाली/ महाड/ म्हसळा/ श्रीवर्धन /पोलादपूर (१५)	-	१५		
		अधिक्षक माथेरान		१		

अ. क्र.	कार्यालयाचे नांव	पदनाम	अनुज्ञेय वाहन प्रकार/संख्या		कार्यालय निहाय एकूण वाहने	
			कार	जीप	कार	जीप
७.	जिल्हाधिकारी, रत्नागिरी	जिल्हाधिकारी	१	-	२	१४
		अपर जिल्हाधिकारी	१	-		
		उप विभागीय अधिकारी दापोली/ चिपळूण/ रत्नागिरी/ राजापूर/ खेड (५)	-	५		
		तहसिलदार मंडणगड/ दापोली/ खेड/ गुहागर/ चिपळूण/ संगमेश्वर/ रत्नागिरी/ लांजा/ राजापूर (९)	-	९		
८.	जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग	जिल्हाधिकारी	१	-	२	११
		अपर जिल्हाधिकारी	१	-		
		उप विभागीय अधिकारी सावंतवाडी/ कुडाळ/ कणकवली (३)	-	३		
		तहसिलदार सावंतवाडी/दोडामार्ग/वेंगुर्ला/कुडाळ/ मालवण/कणकवली/वैभववाडी/देवगड(८)	-	८		
		एकूण	१८	७९	१८	७९
एकूण वाहने			९७			

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३७१/विनियम, दिनांक १०.१०.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१२०२१४३१४१२६१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2017.12.02 15:12:03 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जिल्हाधिकारी, मुंबई शहर/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी व सिंधुदुर्ग

३) अपर जिल्हाधिकारी/ उप विभागीय अधिकारी/ तहसिलदार/ अपर तहसिलदार, अधिक्षक माथेरान. (जिल्हाधिकारी, मुंबई शहर/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी व सिंधुदुर्ग यांच्यामार्फत)

४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई.

५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

६) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.

७) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

८) सह सचिव/ उप सचिव, व्यय-९/विनियम, वित्त विभाग मंत्रालय, मुंबई-३२.

९) सह सचिव, कार्यासन ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१०) निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.